MHNS230016262018

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | १४/०८/२०१८. |
| नोंदणी तारीख | : | १४/०८/२०१८. |
| निकाल तारीख | : | १९/१२/२०१९. |
| कालावधी | : | व.०१ म.०४ दि.०५ |

**इगतपुरी येथील दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, ता. इगतपुरी यांचे न्यायालयात.**
**( पिठासीन अधिकारी आर. एन. खान )**

**संक्षिप्त दिवाणी मुकादमा क्र.०१/२०१८.** **निशाणी क्र.१८**

**किसन लहानु ढवळे,**
वय—६८ वर्षे, धंदा—शेती,
रा. मु. ढवळेवाडी, पो. धामणगांव,
ता. इगतपुरी, जि.नाशिक. **.... वादी.**

**विरूध्द**

**ज्ञानेश्वर रामभाउ माळी,**
वय—४६ वर्षे, धंदा—व्यापार,
रा. ढवळेवाडी, पो.धामणगांव,
ता. इगतपुरी, जि.नाशिक. **.... प्रतिवादी.**

---

वादीतर्फे वकिल — श्री. एस. डी. वालझाडे,
प्रतिवादी तर्फे वकिल — श्री. बी. एस. लहाने

---

**न्यायनिर्णय**
**(पारित दि. १९/१२/२०१९ )**

सदरचा दावा प्रतिवादीकडुन रक्कम रुपये १,५०,०००/— (रक्कम रुपये एम लाख पन्नास हाजर) व त्यावर दावा दाखल तारखेपासुन द.सा.द.शे १८ टक्के दराने व्याज वसुल होवुन मिळणेकरिता दाखल केला आहे.

**वादीचे थोडक्यात कथन खालील प्रमाणेः—**

०२. वादीचे कथन असे आहे की, त्याची जमिन मिळकत ही समुध्दी महामार्ग या

रस्त्यासाठी संपादन झालेली आहे. त्या संपादन झालेल्याजमिन मिळकती बाबत श्री. बाळु लक्ष्मण गंभीरे वसागर लक्ष्मण गंभीरे यांनी हरकत घेतली होती. सदर हरकत घेतल्यानंतर वादीने प्रतिवादी समक्ष बाळु लक्ष्मण गंभिरे व सागर लक्ष्मण गंभिरे यांच्या सोबत बैठक झाली व रक्कम रुपये १,५०,०००/— रुपये तडजोड करुन हरकतीचामोबदल्यात घेवून सदर हरकत मागे घेण्याचे प्रतिवादीचे समक्ष कबुल केलेले होते व सदरची रक्कमही प्रतिवादीच्या ताब्यात देण्याचे ठरविले होते व सदरची रक्कम प्रतिवादीने बाळू लक्ष्मण गंभिरे व सागर लक्ष्मण गंभिरे यांना हरकत मागे घेतल्यानंतर अदा करणार होते. त्यामुळे वादीने प्रतिवादी यांच्या ताब्यात दिनांक १८.१२.२०१७ रोजी रक्कम रुपये १,५०,०००/— हे चे क्रमांक ८९३२३१ दवारे दिलेले होते व सदर रक्कम ही हरकत देणार बाळू लक्ष्मण गंभिरे व सागर लक्ष्मण गंभिरे यांना हरकत मागे घेतेली असलेने अदा करणे कामी दिलेले होते. दिनांक १४.१२.२०१८ रोजी समुध्दी महामार्ग या रस्त्यासाठी संपादन झालेल्या मिळकतीची खरेदीखत असतांना व सदर खरेदीखत करतेवेळी प्रतिवादी देखिल उपस्थित होते व तिथे हरकत देणार बाळू लक्ष्मण गंभिरे व सागर लक्ष्मण गंभिरे यांनी आपसात ठरल्याप्रमाणे त्यांची हरकत मागे घेतलेली होती. त्यमुळे दिनांक १८.१२.२०१७ रोजी चेक क्रमांक ८९३२३१ व्दारे प्रतिवादीकडे दिलेले रक्कम रुपये १,५०,०००/— हरकत घेणार यांना अदा करावयास दिले असतांना प्रतिवादीने सदरची रक्कम ही हरकत घेणार यांना अदा केली नाही. त्यामुळे वादीने हरकत घेणार बाळू लक्ष्मण गंभिरे व सागर लक्ष्मण गंभिरे यांना त्याचे खात्यातुन रक्कमदिली असुन प्रतिवादीने त्याचे ताब्यात असलेली रक्कम गैरहेतुने ठेवुन घेतलेली असुन अदयाप पावेतो हरकत घेणार बाळू लक्ष्मण गंभिरे व सागर लक्ष्मण गंभिरे यांना किंवा वादीला परत केली नाही.

०३.	वादीने प्रतिवादीकडे सदर रक्कमेची वेळोवेळी मागणी केली असता प्रतिवादीने वादीला त्याबदल्यात एक लाख रुपयाचा धनादेश दिनांक २६.०३.२०१८ दिला. परंतु सदरचा धनादेश वादीने बॅकेत टाकला असता तो न वटता परत आला. त्यामुळे वादीने प्रतिवादी विरुध्द याच न्यायालयात संक्षिपत

फौजदारी खटला क्रमांक <u>८४२/२०१८</u> दाखल केला आहे.

०४. वादीने प्रतिवादी यांना दिनांक १३.०७.२०१८ रोजी रजिष्टर पोष्टाने वकीलांमार्फत नोटीस पाठविली असुन प्रतिवादीला सदरची नोटीस मिळाल्यानंतर पंधारा दिवसाच्या आत रक्कम रुपये एक लाख पन्नास हजार परत केले नाही. त्यामुळे वादीस प्रतिवादीकडुन कायदेशिर घेणे बाकी आहे व त्यावर दिनांक १८.१२.२०१७ पासून द.सा.द.शे. १८ दराने व्याज वादीस दयावे. परंतु प्रतिवादीने सदरची रक्कम वादीस दिली नाही. त्यामुळे वादीस प्रतिवादी विरुध्द सदरचा दावा दाखल करणे भाग पडले आहे.

**<u>वादीची विनंती:—</u>**

०५. वादीस प्रतिवादीकडुन रक्कम रुपये १,५०,०००/— व त्या रक्कमेवर दावा दाखल केल्यापासुन रक्कम वसुल होईपावेतो द.सा.द.शे.१८ दराने व्याज वसुल होवुन मिळण्याची विनंती केली आहे.

०६. वादी यानी दाखल केलेला पुराव्यावरुन मी खालील मुददे काढले असुन त्यावरील कारणमिमांसेसहीत मी खालील प्रमाणे निष्कर्ष नमुद केले आहे.

| **अ.नं.** | **<u>मुद्दे</u>** | **<u>निष्कर्ष</u>** |
|---|---|---|
| १ | वादी हा प्रतिवादीकडुन रक्कम रुपये १,५०,०००/— दिल्याची बाब वादीने सिध्द केले काय? | होय. |
| २ | वादी दाव्यात केलेली मागणी मिळण्यास पात्र आहे काय? | अशंत: होकारार्थी. |
| ३ | काय आदेश? | दावा अशंत: मंजूर करण्यात येत आहे. |

०७. वादीने प्रतिवादीकडुन रक्कम रुपये १,५००००/— वसुल होण्याकरीता सदरचा दावा दाखल केला आहे. तसेच वादीने प्रतिवादीकडुन याच रक्कम वसुलीसाठी एक लाख रुपयांचा धनादेश घेतला होता व सदर धनादेश न वटल्यामुळे वादीने प्रतिवादी विरुध्द याच न्यायालयात पराक्रम्य अधिनियम कलम

१३८ अन्वये फौजदारी केस दाखल केली आहे. परंतु मा. सर्वोच्च न्यायालयाचे ***डी.पुरुषोत्तम रेडडी विरुध्द सतिष (२००८) ८ एस.एस.सी ५०५*** या प्रकणातील न्यायनिर्णयामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने असे ग्राहय धरण्यात आले आहे की, एकाच स्वरुपाची घटना व कारण असल्यास पराक्रम्य अधिनियम कलम १३८ अन्वये केस दाखल करता येते तसेच रक्कम वसुलीसाठी खटलासुध्दा दाखल करता येवु शकतो असा न्यायनिर्वाळा दिलेला आहे.

०८. वादीने सदर दाव्यामध्ये रक्कम रुपये १,५०,०००/— वसुल होवुन मिळावे व सदर रक्कमेवर द.सा.द.शे. १८ टकके दराने व्याज मिळण्याची विनंती केली आहे. परंतु व्याजाचा दर द.सा.द.शे. १८ टक्के हा अवास्तव व वाजवी वाटतो. त्यामुळे माझे मते व्याजाचा दर द.सा.द.शे. ०९ टक्के देणे न्याय व उचित होईल.

०९. सदर दाव्याचे प्रतिवादीस दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ३७ (२) (२) नुसार समन्स काढण्यात आले होते. प्रतिवादीस सदर समन्सची बजावणी होवुन तो या कामी वकीलांकामार्फत हजर झाले. त्याने या दाव्यात कैफियत दाखल केली नाही. त्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ३७ नियम २ (३) अन्वये खालील आदेश पारीत करत आहे.

## आदेश

१. वादीचा दावा अशंत: मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादीने वादीला रक्कम रुये १,५०,०००/— (रक्कम रुपये एक लाख पन्नास हजार) व त्यावर दावा दाखल तारखेपासुन सदर रक्कम पूर्णफेड होईपर्यन्त द.सा.द.शे.९ टक्के प्रमाणे व्याज देण्याचे आहे.

३. येणे प्रमाणे हुकुमनामा करण्यात यावा.

Rafia Nasir Khan
Digitally signed by Rafia Nasir Khan
Date: 2019.12.21 16:20:14 +0530

**( आर. एन.खान )**
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, इगतपुरी.

ठिकाण :— इगतपुरी
दिनांक :—१९/१२/२०१९.

**: शेरा :**

मी शपथेवर सांगते की, या पी.डी.एफ. न्यायनिर्णय फाईल मधील मजकूर हा मूळ न्यायनिर्णयातील मजकूराशी शब्द न शब्द सारखा आहे.

कोर्टाचे नाव : आर.एन.खान,
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,इगतपुरी

लघुलेखकाचे नाव : एन. एस. साबळे,

निकालाची तारीख : १९/१२/२०१९

निकालपत्र सही केल्याची तारीख : २१/१२/२०१९

निकालपत्र अपलोड केल्याची तारीख : २१/१२/२०१९